MHJG-1200-1291-2026

**किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१४३/२०२६**
**संदिप तुकाराम शिंदे वि. महाराष्ट्र शासन**

**आदेश निशाणी क्र.१ वरील आदेश**

१. प्रस्तुत अर्ज अर्जदार याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ५०३ नुसार दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन असे की, अर्जदार हे लोनार भायगाव, पो. धिकनगाव, ता. अंबड, जि. जालना येथील रहिवासी असून तेथे शेती व्यवसाय करुन ते त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवतात. अर्जदार याच्या मालकीचे पांढऱ्या रंगाचा मोठे शिंगे असलेला गावरान खिल्लार जातीचा अंदाजे ८ वर्षाचा १ बैल आणि पांढऱ्या रंगाचा निळे शिंगे असलेला गावरान खिल्लार जातीचा अंदाजे ८ वर्षाचा १ बैल असे एकूण २ बैल आहेत. सदरचे २ बैल हे अर्जदार याने दिनांक २८.०३.२०२६ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, चाळीसगाव येथून खरेदी केले होते. त्यानंतर सदर २ बैल अर्जदाराने त्यांची वाहतूक करुन त्यांच्या शेतापावेतो पोहोचविण्यासाठी वाहन चालक नामे श्री.बिभिषण भागोजी जाधव यांच्या वाहनात भाडे ठरवून त्यास सुपूर्द केले होते. सदरचे बैल यांची वाहतुक करतेवेळी ते चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन यांनी गु.रजि.क्र.१३७/२०२६ यामध्ये प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११(१)सी, ११(१)डी, ११(१)एफ, ११(१)इ आणि महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ चे कलम ८३ व १७७ अन्वये जप्त करुन पोलीसांनी ताब्यात घेतलेले आहेत.

३. अर्जदाराचे कथन पुढे असे की, सदर बैल अर्जदाराच्या शेतीसाठी उदरनिर्वाहासाठी खरेदी केलेली आहेत. सदर गुन्हयाचा तपास आणि खटल्याची चौकाशी कामकाजास खूप मोठा कालावधी लागणार आहे. सदर बैलांची चारा–पाण्याची तसेच त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असते. सदर बैलांना चारा–पाणी वेळेवर न मिळाल्यास

त्यांचे आरोग्यावर विपरीत परिणाम होवुन ते दगावण्याची देखील शक्यता आहे. परिणामी अर्जदाराचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्जदारास त्याचे कायदेशीर हक्कास मुकावे लागेल. तसेच जप्त केलेली गुरे ही अर्जदाराचे उदनिर्वाहाचे एकमेव साधन असल्यामुळे ते परत न मिळाल्यास अर्जदार आणि त्याचे कुटूंबियांवर उपासमारीची वेळ येणार आहे. अर्जदार यांचे कथन असे की, जर सदर बैल अर्जदाराला परत मिळाल्यास अर्जदार ते बैल कोणासही विकणार नाही किंवा त्यांचे हस्तांतरण करणार नाही. त्यामुळे या सर्व कारणास्तव अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

४. प्रस्तुत अर्जावर तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे सादर केले आहे. तपासी अंमलदार यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये सदरची जप्त बैल हे श्री संत मिराबाई गोशाळा, कुंझर, ता. चाळीसगाव येथे चारा पाण्याकरीता ठेवण्यात आले असल्याचे नमुद केले आहे. अर्जदाराचे त्याच्या मालकी हक्काबाबत कागदपत्र हजर केल्यास सदर जनावरे न्यायालयाच्या अटी व शर्ती नुसार परत करण्यास हरकत नसल्याचे कथन केले आहे.

५. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी नि.क्र.६ वर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये आरोपी मिळून आलेल्या बैलांना अत्यंत निर्दयतेने वागणूक देवून त्यांना वाहनात दाटीवाटीने कोंबून वाहतुक करतांना मिळून आला आहे. अर्जदारास जप्त बैल परत केल्यास ते पुन्हा अशा प्रकारचा गुन्हा करण्याची शक्यता असल्याचे म्हटले आहे. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी पुढे असे कथन केले आहे की, मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाचे Shri Co–vigyan Anusandhan Kendra Vs. State of Maharashtra मधील न्यायनिवाड्यात मा. न्यायालयाने मत व्यक्त केले आहे की, अर्जदार यांचेकडे चारा–पाण्याची व्यवस्था नसल्यास गोशाळा चांगल्याप्रकारे पालनपोषण करु शकते. केवळ खरेदी–विक्रीच्या पावत्यांवर गुरे परत करणे योग्य नाही. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांचे Reguramdharma & anr. Vs. Thulsi & anr. या न्यायनिवाड्यात मा. न्यायालयाने मत व्यक्त केले आहे की, प्राण्यांची वाहतुक नियम, १९७८ नियम ५६ चा भंग

केला असेल तर सदरची गुरे परत करु नये. सदर अर्जात प्राणी वाहुकीचा परवाना सक्षम अधिकारी यांचेकडून घेतल्याचे दिसून अथवा आढळून येत नाही व तसा पुरावा अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

६. प्रस्तुतच्या अर्जाकामी श्री संत मिराबाई गोशाळा कुंझर, ता. चाळीसगांव, जि. जळगांव यांचे म्हणणे मागविण्यात आले. त्यांनी नि.क्र.७ वरील म्हणणे दाखल करुन त्यांनी जप्त केलेले बैल हे दिनांक २८.०३.२०२६ पासून त्यांच्या निगराणीत असून त्यांना देखभाल व चारा खर्च प्रति बैल रक्कम रु.३५०/– मिळावा अशी विनंती केलेली आहे व सदर खर्च मिळाल्यास जप्त बैल हे अर्जदारास देण्यास हरकत नसल्याचे कथन केले आहे.

७. अर्जदार तर्फे सुविद्य विधिज्ञ श्री.आर. ए. लांडगे यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील यांचा देखील युक्तीवाद ऐकला. उभयतांनी त्यांच्या अर्जातील व म्हणण्यामधील कथनांच्या अनुषंगाने युक्तीवाद सांगितला.

८. अर्जदार यांनी अर्जाचे पृष्टयर्थ त्याचे शपथपत्र निशाणी क्र.०४ वर दाखल केले आहे. अर्जदाराने त्यांचे शपथपत्रात, सदरचे जप्त बैल हे शेतीसाठी म्हणजेच उदनिर्वाहासाठी खरेदी केल्याचे कथन केले आहे. सदर बैल हे अर्जदाराचे मालकीचे व ताब्यातील असून त्यांचे पालनपोषण करणे आवश्यक आहे. बैल पोलीस ठाण्यात जमा राहिल्यास त्यांच्या खाण्यापिण्याचे हाल होवुन त्यांचे आरोग्य खराब होवुन ते दगावण्याची जास्तीची शक्यता आहे असे देखील नमुद केलेले आहे. अर्जदार यांनी शपथेवर कथन केले की, सदरचे बैल त्यांच्या ताब्यात दिल्यानंतर ते न्यायालय करेल त्या अटी व शर्तींचे पालन करतील. अर्जदार यांनी चाळीसगांव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दि. २८.०३.२०२६ रोजी बैल विकत घेतल्याबाबतची पावती आढळुन न आल्यामुळे दिनांक १६.०६.२०२६ च्या पत्रान्वये कृषी उत्पन्न बाजार समिती, चाळीसगाव यांनी दिलेल्या मुळपावत्यांची दुय्यम प्रत व त्यासोबत पत्र निशाणी क्र.९ वर दाखल केले आहे. सदर पावतींचे अवलोकन केले असता, अर्जदार याने कैलास रविंद्र शेलार याच्याकडुन जप्त बैल खरेदी केलेले असल्याचे स्पष्ट होते. तसेच तपासी

अंमलदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये जप्त बैल हे अर्जदाराला योग्य त्या अटी व शर्तीवर देण्यास त्यांची हरकत नसल्याचे कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी सदर बैल सदर केसचा निकाल लागेपर्यंत कोणासही विकणार नाही असे शपथेवर कथन केले आहे. अभिलेखावरील कृषी उत्पन्न बाजार समिती, चाळीसगांव यांचेकडील पावतीवरुन अर्जदार यांनीच सदरचे जप्त २ बैल खरेदी केलेले होते असे प्रथमदर्शनीय दिसुन येते. अर्जदाराने सदरचे बैल हे शेती व्यवसायाकरिता खरेदी केल्याचे कथन केल्यामुळे अर्जदार त्यांच्या चारापाण्याची व्यवस्था करण्यास सक्षम असल्याचे दिसते. प्रस्तुत गुन्ह्याचा तपास बाकी असून अंतिम निकाल होण्यास बराच कालावधी लागणार आहे. प्रस्तुत गुन्हयाचा खटला अजून सुरु झालेला नाही, त्यामुळे प्राणी वाहतुकीचा परवाना नसल्याबाबतचा पुरावा सदरचा अर्ज निकाली काढतेवेळी विचारात घेणे न्यायोचित होणार नाही. अर्जदार हे प्रस्तुत गुन्ह्यात आरोपी नाही त्यामुळे अर्जदाराचे मालकीचे बैल हे त्यांना परत देणे न्यायाचे कारणास्तव योग्य व संयुक्तीक होईल. वरील सर्व बाबींचा विचार करता सदरचे जप्त बैल हे खालील अटीवर व शर्तीवर अर्जदाराच्या अंतरिम ताब्यात देणे उचित होईल. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे–

## आ दे श

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. तपासी अंमलदार/पोलीस ठाणे अंमलदार चाळीसगांव (शहर) पोलीस ठाणे यांना आदेशित करण्यांत येते की, गुन्हा नोंदणी क्र.१३७/२०२६ मधील जप्त पांढऱ्या रंगाचा मोठे शिंगे असलेला गावरान खिल्लार जातीचा अंदाजे ८ वर्षाचा १ बैल आणि पांढऱ्या रंगाचा निळे शिंगे असलेला गावरान खिल्लार जातीचा अंदाजे ८ वर्षाचा १ बैल असे एकूण २ बैल हे अर्जदाराला त्याच्या मुळ मालकीप्रमाणे ताब्यात रक्कम रुपये ५०,०००/- च्या हमी पत्रावर खालील अटींवर देण्यांत यावी.

अ) अर्जदार यांनी श्री संत मिराबाई गोशाळा, कुंझर, ता. चाळीसगांव, जि. जळगांव यांना सदरचे बैल सांभाळण्यासाठी प्रती दिवस रु.२००/– असा सदरचे बैल ताब्यात

मिळेपर्यंत आलेला खर्च सदर गोशाळा यांना द्यावा.

ब) अर्जदार यांनी गु.रजि. क्र.१३७/२०२६ चा संपुर्ण अंतिम निकाल लागेपर्यंत सदरचे जप्त २ बैल कोणासही कोणत्याही मार्गाने हस्तांतरीत करु नये. तसेच अर्जदार यांनी सदरच्या २ बैलांची कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावु नये अगर सदर २ बैलांना कोणत्याही प्रकारची इजा करु नये असे आदेशित करण्यात येते.

क) तपासणी अंमलदार / पोलीस ठाणे अंमलदार यांनी सदर जप्त २ बैलांचे फोटो घ्यावेत.

ड) तपासी अंमलदार/ पोलीस ठाणे अंमलदार यांनी सदर २ बैलांचा सविस्तर पंचनामा करावा. तसेच सदर जप्त २ बैलांचे व्हिडीओ रेकॉर्डींग करुन दोषारोपपत्रासोबत दाखल करावेत.

इ) हमीपत्र, फोटो, पंचनामा, व्हिडीओ रेकॉर्डींग न्यायालयात त्वरीत दाखल करावेत.

PRIYANKA KESHAVRAO KADAM

Digitally signed by PRIYANKA KESHAVRAO KADAM
Date: 2026.06.22 17:54:47 +0530

(प्रियंका के. कदम)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
(न्यायालय क्र.२) चाळीसगांव.

दिनांकः–२२/०६/२०२६.

किर. फौ. अर्ज. क्र.१४३/२०२६
निशाणी क्र. १

# CERTIFICATE

" I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word as per original order."

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : D. T. Kurhade. |
| Court Name | : Smt. P. K. Kadam, Judicial Magistrate F. C., (2nd Court), Chalisgaon. |
| Date | : 22.06.2026. |
| order signed by presiding officer on | : 22.06.2026. |
| order uploaded on | : 22.06.2026. |